दि. २९ जून २००८ ला बेसाईड न्यूयॉर्क येथे झालेला संगीतकार श्रीधर फडके यांचा सुरेल आणि सुश्राव्य कार्यक्रम ' फिटे अंधाराचे जाळे ' म्हणजे रसिकांना मेजवानीच होती. आपले वडिल (कै.) सुधीर फडके यांच्या अमर, अवीर भावगीतांबरोबरच आपली स्वतःची गाजती भावगीते त्यांनी उत्कृष्टपणे गाऊन सादर केली आणि पुनः प्रत्ययाबरोबरच नवनिर्मितीही ऐकण्याचा आनंद श्रोत्यांना भरभरून दिला. मोजक्या आणि आवश्यक तेवढयाच साथीत तबल्यावर प्रसाद जोशी, तर संवादिनीवर (Harmonium) श्रीधरजी स्वतःच होते. मयूर देवलांचे निवेदन अगदी माफक होते हे आवडले. कार्यक्रमाच्या ओघात श्रीधरजींनी त्याच एका उच्चारातून ('धुंद' आणि 'धुंदी' मधला 'धुं') तीन वेगवेगळे भाव कसे प्रकट होतात याचे दिलेले सोदाहरण स्पष्टीकरण ऐकून जाणकार रसिकांना भावगीताच्या 'अंतरीची खूण' च जणू गवसली ! मनोरंजनाबरोबरच जातां श्रोत्यांना 'शहाणे' करून सोडणारी ही मैफल त्यामुळे अधिक रंगदार झाली.

कलाकार त्याच दिवशी सकाळी वॉशिंग्टनहून निघाल्यामुळे दुपारी न्यूयॉर्कच्या कार्यक्रमाला पोचायला त्यांना झालेला उशीर श्रोत्यांनी शांतपणे सहन केला, हे इथे नमूद केले पाहिजे.

विजय कदम व क्षितिज झारापकर यांनी न्यूयॉर्कच्या बृहनमहाराष्ट्र संमेलनात केलेली बतावणी अजून लक्षात असल्यामुळे विजय कदम यांच्या 'खुमखुमी' विषयी बरीच उत्कंठा न्यूयॉर्करांना होती.

खरपूस संवाद आणि खणखणीत नाचगाणी यांनी हा हलकीफुलका कार्यक्रम खुमासदार झाला. कार्यक्रमाचं खास आकर्षण ' मुंबईकर पुणेकर जुगलबंदी' हे होतं, ते अपेक्षेप्रमाणे रंगलं विजय कदमांबरोबरच त्यांचे साथीदार किरण जोगळेकर इत्यादींचे दिलखुलास अभिनंदन !

महाराष्ट्र मंडळ कार्यकरिणीने या वर्षी सदस्यांना व्यक्तिशः कार्यक्रमांचे सहआयोजन करण्याची विनंती केली होती. त्याला अनुसरून मागच्या ' गजरा' कार्यक्रमासाठी एक अनामिक देणगी आली होती. या कार्यक्रमासाठी श्री. श्रीकांत व सौ. सुहासिनी जोशी यांची देणगी आली. हे येथे नमूद करण्यास आनंद होतो.

--सुषमा येरवडेकर